
ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA








Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | नोकरी करणाऱ्या स्त्रीयांच्या आहारविषयक समस्या व उपाययोजना<br>**डॉ. शामली जा. दिघडे** | ६७-७० |
| १५ | किशोरवयीन मुलींचे अपुरे पोषण व त्यावरील उपाययोजना<br>**डॉ. सारीका एन. दांडगे (बोदडे)** | ७१-७५ |
| १६ | मानवी जीवनाकरीता पोषक घटकांचे महत्त्व<br>**प्रा. सारीका गो. नंदे (पांडे)** | ७६-७९ |
| १७ | दररोज उपयोग आपणल्या जाणाऱ्या वेळ/श्रम बचतीच्या साधनांचा स्त्रियांच्या मते आढावा घेणे<br>**सीमा उपासनी (सौ. देशपांडे)** | ८०-८४ |
| १८ | शैक्षणिक मुल्यांचे मराठी भाषा व मराठी वाङमयातील महत्व व स्थान : एक आढावा<br>**प्रा. सिध्दार्थ कुंडलिक इंगोले** | ८५-८८ |
| १९ | भारतातील निवडणुक व्यवस्था<br>**डॉ. ए. डी. जाधाव**<br>**डॉ. व्ही. के. जाधव** | ८९-९४ |
| २० | आहारातील पोषण मूल्यांची कमतरता आणि आरोग्य<br>**प्रा. प्रिया श्रीकांत खोरगडे** | ९५-९७ |
| २१ | इतिहास अध्यापनातील नाविन्यपुर्ण पध्दती<br>**प्रा. प्रितम वसंतराव गावंडे** | ९८-१०० |
| २२ | ई-कॉमर्स आणि व्यवसाय<br>**प्रा. प्रकाश मारोतराव वांढरे** | १०१-१०५ |
| २३ | अध्ययन - अध्यापनप्रक्रियेत वाचनकौशल्याचे महत्त्व<br>**डॉ. पवन मांडवकर** | १०६-१११ |
| २४ | आदिवासी साहित्य<br>**प्रा. डॉ. आशालता आसुटकर** | ११२-११६ |
| २५ | भारतीय शेतीवर आधारीत उद्योगधंदे<br>**प्रा. गजानन लिंबाराव सोडनर** | ११७-१२० |
| २६ | स्त्री संघर्षाची मांडणी : संदर्भ ग्रामीण साहित्य<br>**प्रा. यु. डी. चव्हाण** | १२१-१२४ |

४. भंगाळे, प्रा.डॉ.शैलजा — इतिहास : आशययुक्त अध्यापन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव, प्रथम आवृत्ती १ जानेवारी २०१६

# २२. ई-कॉमर्स आणि व्यवसाय

**प्रा. प्रकाश मारोतराव वांढरे**
श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा.

**प्रस्तावना**

आजचे युग हे जागतिकीकरण ,खाजगीकरण व उदारीकरणाचे आहे. आजच्या एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सर्व व्यवहाराचे स्वरूप बदललेले दिसते. आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञानाची फार मोलाची भुमिका बजावत आहे.प्रारंभिच्या काळात हुंडयाची देवान घेवान केल्या जात असत व्यवसाय हा मुद्रेध्दारे रोख स्वरूपात केल्या जात असत. आज इंटरनेट मुळे सपुंर्ण जगाला जागतिक खेडे रूपांतरीत केले आहे.सपुर्ण जागतिक अर्थव्यवस्था कौशल्यपुर्ण नाविण्यपुर्ण व्यवस्थापन व माहीती वितरण यावर निर्भर असते. जागतिक अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाने व्यवसाय वर्तळात माहीती ची किमंत वाढली.त्या योगे संधी वाढल्या आजच्या युगात इंटरनेटच्या माध्यमातुन व्यापार केला जातो.

व्यापार म्हणजे नफा मिळविण्यासाठी करण्यात येणारी वस्तूची खरेदी विक्री होय. व्यापाऱ्यामध्ये क्रेता आणि विक्रेता हे दोन्ही एकत्र येऊन वस्तू व सेवाची देवान घेवान करतात. तसेच उत्पादीत वस्तू ग्राहकापर्यत पोहचविण्यासाठीकराव्या लागणाऱ्या सर्व कियाचा समावेश व्यापारात होतो.परंतू ई—कामर्स मध्ये आज संगणकामुळे व इंटरनेटच्या माध्यमातून ग्राहक विक्रेत्यांशी संपर्क साधतो.व वस्तूचा आदेश देतो.तसेच रकमेचे शोधन ऑनलाईन करतो.त्याच बरोबर खरेदी विक्री साठी लागणाऱ्या सर्व क्रिया पार पाडतो. अशा तऱ्हेने बॅकेशी संबधीत सर्व व्यवहार ई— कॅश च्या माध्यमातून पुर्ण करतो.

**ई — कॉमर्स अर्थ व संकल्पना**

प्रारंभिक अवस्थेत ई — कॉमर्स म्हणजे व्यापार विषयक दस्त ऐवजाचे दळणवळण एवढाच अर्थ लक्षात घेतला जात असे तेवढीच कार्य ई—कॉमर्स हया संकल्पनेत अंतर्भूत होतो. परंतू इंटरनेट वर जसे जसे विविध सोई युक्त ब्राऊझर्स उपलब्ध होत गेलेले तसातसा ई कॉमर्स चा अर्थ बदलत गेलात साध्या आणि सोप्या भाषेत ई— कॉमर्स म्हणजे इलेक्ट्रानिक व्यापार होय.

**ई—वाणिज्याच्या व्याख्या**

१) ई वाणिज्य हा हा वाणिज्याकरीता उपयुक्त क्रियांचा संच आहे ज्य नेटवर्क वरून केल्या जातात.

२)इलेक्ट्रानिक कॉमर्स म्हणजे इंटरनेटवरून वस्तू आणि सेवाची होणारी खरेदी विक्री होय.

३)वस्तू माहिती आणि सेवा याची खरेदी आणि किमंतीचे शोधन या सारख्या वाणिज्य विषयक उलाढाली इंटरनेट वरून करणे म्हणजे ई—कॉमर्स होय.

**ई —कॉमर्स म्हणजे चा व्यापार पुर्ण होण्यासाठी आवश्यक घटक**

१)वस्तू चतवकनबज

२)वेबसाईट प्रसारण कंपनी ेिवेजपदह ेमतअमत

३)वेबसाईट ूमइेपजम

४)माल विक्रीच्या सोई ेिवचपदह बंतज

५)इलेक्ट्रानिक शोधन प्रक्रिया

६)व्यापारी खाते डंतबींदज ंबबवनदज

७)शोधन प्रणाली चंलउमदज

८)विपणन डंतामजपदह

**ई—कॉमर्स चे महत्व**

सध्याच्या आधुनिक काळात संगणक व मोबाईलचाच वापर फार मोठया प्रमाणत इंटरनेटचा उपयोग केल्याजात आहे. इंटरनेट सेवा ही माहितीचे फार मोठे मायाजाल आहेत त्यामुळे नेटवर्कची सर्व कामे सहज व सुलभ व कमी वेळात होऊन राहीली आहेत. ई—कॉमर्स ध्दारे ग्राहक व व्यापारी वर्ग एकामेकाशी जोडला गेला आहे. यासाठी शासनाने सुध्दा कमीत कमी किमती मध्ये इंटरनेट सेवा ग्राहक व्यापर वर्गासाठी उपलब्ध करून दिली आहे. उदा.जीओ

**ई—कॉमर्स संधी आणि आव्हाने**

ई—कॉमर्स मुळे आपल्या देशातील विविध क्षेत्रात मिळणाऱ्या संगणक व इंटरनेट वरील प्रसारामुळे दळणवळण वाढले आहेत. सुरवातीस ई— मेल च्या सुविधेमुळे पत्रव्यवहार ,संपर्कात अफाट वेग व वेळेची व पैशाची बचत होऊ लागली.कागदाचा वापर कमी प्रमाणत होऊ लागला.कारकुनी कामे कमी कमी व्हायला मदत झाली व त्यातून पारंपरीक व्यापाराची संकल्पना बदलू लागली. कागदपत्रे,बिजके बाहेर गावी पाठविणे मालाची देवाणघेवाण आर्थिक हिशेब पत्रके लिहणे खरेदी विक्री साठी प्रत्यक्षात अनेक कर्मचाऱ्यांना न गुतंवता इलेक्ट्रानिक माध्यमाचा वापर करण्यात येतो. ई— कॉमर्स च्या माध्यमातून गुतंवणूकदारांच्या कंपनी चे अहवाल व शेअर्स च्या उलाढालीची माहीती घर बसल्या मिळवू शकतो. सुशिक्षीत बेरोजगाराना नोकरीच्या संधी आपल्या विविध साईट वर जाऊन बघू शकतो. व त्या उद्योगात अर्ज सादर करू शकतो.

**ई—कॉमर्स भारतापुढे असणारी आव्हाने**

ई—कॉमर्स च्या माध्यमातून ज्या विविध संधी व सुविधा प्राप्त झाल्या आहेत भारत हा प्रथम खेडयाचा देश आहे.हया देशात गरीबी रेषेखालील जनता ही ६०टक्के आहत गरीबी अशिक्षीतपणा हयामुळे अजूनही आपल्या देशातील ग्रामीण भाग हा माहिती तत्रंज्ञानापासून खुपच दुर आहे. आणि हे सर्व तंत्रज्ञान प्राप्त करण्यासाठी सर्वात प्रथम त्यांना शिक्षीत करण्यासाठी ग्रामीण भागा मध्ये प्रशिक्षण वर्ग हयाचे आयोजन

महत्वाचे आहे.या ग्रामीण व गरीब सामाजातील घटकाला उपयुक्त ठरण्यासाठी अजूनही खुप अडचणी व आव्हाने आहेत.त्यापुढील प्रमाणे:—

१)अपुरी साक्षरता

२)शिक्षणाचा अभाव

३)असमतोल आर्थिक रचना

४)वातावरण निर्मिती

५)इंटरनेटची साक्षरता

६)दुरस्त ग्रामिण भाग

७)इग्रजी भाषेचा अभाव

**ई —कॉमर्स ची भारतातील सध्यास्थिती**

ऑनलाईन विक्रीचा व्यापार अजून नवजात स्वरूपात आहे.मात्र बाजारपेठेचा वेग आशिया प्रंशात क्षेत्रातील इतर देशाच्या तुलनेत निश्चीतच जास्त आहे. भारतात हा बाजार ३.५ अब्ज डॉलरचा असून या मध्ये वर्षा गणित ६ ते ७ टक्के वाढ होत आहे.मात्र एकून किरकोळ क्षेत्राच्या तुलनेत ही वाढ ४ टक्क पेक्षाही कमी आहे. देशातील तरूण वर्गा मध्ये मोठया प्रमाणात इंटरनेटचा वापर सर्रास होत असल्यामुळे ऑनलाईन खरेदीचा वाढता ट्रेड पाहून ग्राहकपयोगी वस्तू ,अन्न पदार्थ आणि शितपेय कंपन्या ई— कॉमर्स मध्ये आपली गुतंवणूक वाढवीत आहेत. मोबाईलध्दारे ऑनलाईनखरेदीचे प्रमाण ५ टक्के पेक्षा कमी असले तरी स्मार्ट फोन वाढत्या जमाण्यात ई—कॉमर्स साठी पोषक वातावरण निर्माण होत आहे. ई—कॉमर्स विविध साईट ला भेट देणाऱ्यांपैकी ३० टक्के टॅब्लेट किवा मोबाईल ग्राहकाचा समावेश आहे.याचाच परिणाम म्हणजे भारतात व्यापार व उद्योग क्षेत्रात ई—कॉमर्स चा व्यवसायासाठी मोठया प्रमाणावर उपयोग होत असून रिलायन्स ,टाटा,फिल्पकार्ट, जस्ट डायल, स्नॅपडील,रेस्टॉरन्ट इत्यादी उद्योग समुह याचा वापर व्यवसायासाठी करताना दिसून येतात.आज आपल्या देशात सर्वात जास्त फिल्पकार्ट, जबॉग, स्नॅपडील,मंत्राह,ॲमझोन ई—बाय जंगली नापतोल,इंकफ्रुट,पिपरफ्राय बेबीओय इ. अनेक वेबसाईट वरून मोठया प्रकारे ई— शॉपिंग हाताना दिसुन येते.

आपल्या देशात विदेशी कंपन्या मोठया प्रमाणात गुतंवणूक केली आहे. त्यामुळे ई—कॉमर्स च्या माध्यमातून उत्पादीत वस्तूना विक्रीसाठी बाजारपेठा उपलब्ध होऊन विक्रीचे प्रामाण वाढले आहे.त्याच बरोबर विपणन व वितरणाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल.व्यवस्थापन व प्रशासनामध्ये पारदर्शकता निर्माण होईल. श्रम,वेळ,व पैसा इ. बचत होऊन उत्पादन खर्चात बचत होईल.वाजवी किमत धोरण ठरविण्यास मदत होईल. संगणक साक्षरतेंचे प्रमाण वाढेल.रोजगाराच्या क्षेत्रात वाढ होऊन बेरोजगाराची समस्या सुटेल. कायदेशीर बाबीची पुर्तता करणे दिरंगाईतून सुटका होईल.,इ. अनेक प्रकारचे लाभ होईल.ई—कॉमर्स ची भुमिका देशाच्या विकासासाठी व विस्तारासाठी पुरक असून देशामध्ये स्थिरता व उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यासाठी पोषक ठरेल.

**ई—कॉमर्सचा सध्याचा भारतावरील परीणाम**

भारतामध्ये ऑनलाईन खरेदी करण्यावर अलीकडे अनेकाचा भर असतो. वेळ,पैसा वाचविण्यासाठी हा मार्ग अनेकाना चांगला वाटतो.सरकारही अशा व्यवहाराला अधिक प्रोत्साहन देताना आढळते पण या महिण्या पासून ई—कॉमर्स वर काही निर्बंध येणार असून नविन नियम लागू झाले आहेत.त्यामुळे ई—सेवा चांगल्या प्रकारे मिळणार नसून पुर्विच्या तुलनेत वस्तू आणि सेवा साठी अधिक पैसे मोजावे लागतील.कॅश बॅक सारख्या ग्राहकाला फायदा देऊ शकतील.अशा योजनाही राबविता येणार नाही.वस्तू उशीरा प्राप्त होणार आहेत.एक दोन दिवसात वस्तू मिळण्याऐवजी चार ते सात दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. ऑन लाईन सेवा महाग झाल्यामुळे त्या कंपन्यावर परिणाम होऊ शकतो.ई—कॉमर्स कंपनीचा किवा तिचा समूह कंपन्याचा भांडवली हिस्सा असल्यास किवा एखाद्या कंपनीच्या साठयावर ई—कॉमर्स वा तिच्या समूह कंपनीचे नियंत्रन असल्यास

अशा कंपन्याच्या उत्पादनाची ई—कॉमर्स कंपन्यानां १ फेब्रुरवारी पासून विक्री करता येणार नाही.तसेच ई—कॉमर्स वरून विकल्या जाणाऱ्या वस्तू वरही बंदी घालण्यात आली आहे.त्यामुळे ,फिल्पकार्टसारख्या ई—कॉमर्स कंपन्याना चांगला फटका बसणार आहे.अशा कंपन्या अनेकांना आपल्याकडे आकर्षित करून घेत असतात. काही वस्तू केवळ काही कंपन्याच विकतात. तसा त्याच्यात करार होतो.मात्र आता असे व्यवहार करता येणार नाही.त्यामुळे कंपन्या बरोबरच त्या अस्तीत्व वरही मोठा प्रभाव निर्माण होण्याची शक्यता आहे. नव्या नियमामुळे या कंपन्यां नाही मोठी किंमत मोजावी लागणार आहे. अमेरिकेच्या अनेक कंपन्या भारतात गुतंवणूक कारतात. त्यात वालमार्ट आणि ॲमेझॉन या कंपन्या अग्रेसर आहेत .त्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास अमेरिकेने भारतास सांगीतले आहे. वालमार्ट आणि ॲमेझॉन या दोन कंपन्यानी भारतात मोठया प्रमाणावर गुतंवणूक केली आहे. वालमार्टने ५.५ अब्ज डॉलर, आणि ॲमेझॉनने १६ अब्ज डॉलर इतकी गुतंवणूक करण्याचे आश्वासन दिले आहे. तरीही नव्या नियमाने छोटया व्यापाऱ्यांना फार फायदा होणार नाही. याचा परिणाम परदेशी गुतंवणूक आणि नोकऱ्यावर पडू शकतो. मोठे व्यापारी जे सुईपासून सिमेंट पंर्यत विकतात त्यांना फायदा होऊ शकतो. ऑनलाईन मुळे त्यांना मोठे नुकसान होत होते.भारतीय व्यापाऱ्यांना हे नियम फायदेशीर ठरू शकणार आहे.विदेशी कंपन्याशी टक्कर देण्याची ज्याच्याकडे जास्त ताकत नव्हती. त्यांना आता ताकत मिळणार आहे.परदेशी कंपन्यानी संपूर्ण बाजार गिळंकृत केला होता त्यातून आता भरतीय कंपन्या पुढे येऊ शकतील. ॲमेझॉनवरून तर अनेक कंपन्याच्या वस्तू गायब झालेल्या दिसत आहे.एकुनच या सर्वाचा परिणाम जनतेवर होणार आहे.कारण त्यांना प्रत्येक वस्तू महाग मिळणार आहे.स्वस्त ,कॅशबॅक सारखे शब्द आता विसरायला लागणार आहे. ई—कॉमर्सचे नवे नियम सर्व सामान्यांचां खिसा कापणारे ठरणार आहेत.

**निष्कर्ष**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात व्यवसायीकाव्दारे ई—कॉमर्सचा नाविन्य पुर्ण रितीने वापर होत आहे. यासाठी तरून वर्ग खरेदीला चांगला प्रतिसाद देत आहे.त्यामुळे मोठी मागणी निर्माण होत आहे.उत्पादक मोठया प्रामाणत वस्तूचे उत्पादन करीत आहे.व्यापारा मध्ये वस्तू च्या विक्री बाबात स्पर्धा निर्माण होऊन दर्जेदार उत्पादनांची निर्मिती होत आहे.विस्तृत बाजारपेठा यामुळे व्यवसायीकांना उपलब्ध आहे.इंटरनेट च्या वापरामुळे

संपूर्ण जगातील बाजार भावाची कल्पना एका किल्क वर ग्राहकाला येत असते.ई—कॉमर्स च्या वापरामुळे प्रायव्हसी ,सुरक्षाप्रश्न तंत्रज्ञानातील बदल विश्वसाहार्यता,गुप्तता या सारख्या काही तांत्रीक अडचणी असून त्यावर मात करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे.

ई—कॉमर्स देशातील व्यवसायाला प्रगतीपथावर नेण्यास उपयुक्त ठरेल. हया तंत्रज्ञानाचा वापर फक्त मोठया कंपन्या कडूनच या तंत्रज्ञानाचा वापर होताना दिसून येतो.लहान उद्योगांना आर्थिक तांत्रीक अडचणी मुळे याचा वापर करणे शक्य नसल्यामुळे स्पर्धच्या काळात ई—कॉमर्स वापर न करता यणे फार मोठया अडचणीचे ठरले आहे. त्यासाठी शासनाने स्वता पुढाकार घेउन नियोजन बध्द वापरासाठी प्रोत्साहन दिल्यास निश्चीतच देशातील महत्वपुर्ण असलेल्या उद्योग—व्यवसाय ,लघु व कुटीर उद्योगांना सुध्दा अडचणीतून बाहेर काढून त्याची प्रगती व विकास साधता येऊ शकेल. त्यामुळे भारतातील उद्योग, व्यापार ,व्यवसाय ,सेवा इ. सर्वच क्षेत्रात सार्वगीक व समतोल विकास साधण्यात ई—कॉमर्सची भुमिका व योगदान महत्वपुर्ण ठरेल.

**संदर्भ सूची**

१. ई—कॉमर्सची मुलतत्वे एस.एम. कोलते ,पिपळापुरे प्रकाशन ,नागपुर
२. माहिती तंत्रज्ञान आणि व्यवसायीक माहिती कार्यपध्दती. एस.एम. कोलते ,पिपळापुरे प्रकाशन, नागपुर
३. इंटरनेट व वेबसाईट
४. दैनिक पुण्य नगरी दि.५फेब्रवारी २०१९

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

An International Multidisciplinary Quarterly Research Journal

# AJANTA

ISSN 2277 - 5730

Volume - VIII, Issue - I, January - March - 2019

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. प्रकाश मारोतराव वांढरे

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

ई-कॉमर्स आणि व्यवसाय

Editor : Vinay S. Hatole

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com